**<u>ठळक बातम्या</u>**

- यंदाच्या खरीप हंगामासाठी १४ पीकांच्या किमान आधारभूत किंमतीत वाढ करण्याचा केंद्र सरकारचा निर्णय

- सोनं आणि चांदीवरील आयात शुल्क ६ वरुन १५ टक्के करण्याचा केंद्र सरकारचा निर्णय

- सीबीएसई बारावीच्या परीक्षेत ८५ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण

- नीट पेपरफुटीप्रकरणी आतापर्यंत देशभरातून ५ जणांना अटक, पुणे आणि अहिल्यानगरमधून दोघे ताब्यात

- काटकसरीसाठी राज्य सरकारमधल्या मंत्री आणि अधिकाऱ्यांच्या परदेश दौऱ्यावर निर्बंध, ताफ्यातली वाहनं निम्म्यावर

**आणि**

- नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळ्याच्या बोधचिन्हाचं अनावरण

**<><><><><><>**

यंदाच्या खरीप हंगामासाठी १४ पिकांच्या किमान आधारभूत किमतीत वाढ करायला केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. ऐकुया याविषयीचा सविस्तर वृत्तांत...

**होल्ड.. कॅप्सुल**

*(यंदाच्या खरीप हंगामात ८२४ लाख मेट्रिक टनांपेक्षा जास्त पिकांची खरेदी किमान हमी दरानं करण्याचं केंद्र सरकारचं उद्दिष्ट आहे. यातून शेतकऱ्यांना दोन लाख ६० हजार कोटी रुपये मिळतील, असं माहिती प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी नवीदिल्लीत वार्ताहर परिषदेत सांगितलं.*

*तांदळासाठी यंदा प्रति क्विंटल २ हजार ४४१ ते २ हजार ४६१ रुपये एमएसपी मिळेल. ज्वारीसाठी ४ हजार २३ ते ४ हजार ७३ रुपये दर मिळेल. बाजरीसाठी २ हजार ९००, नाचणीसाठी ५ हजार २०५ रुपये प्रतिक्विंटल दर मिळेल. कडधान्यात तुरीसाठी ८ हजार ४५०, मुगासाठी ८ हजार ७८०, उडदासाठी ८ हजार २०० रुपये प्रतिक्विंटल दर असेल. कपाशीसाठी हा दर ८ हजार*

*२६७ ते ८ हजार ६६७ रुपये असेल. तेलबियांमध्ये भुईमुगासाठी ५ हजार ५१७ रुपये, सूर्यफुलासाठी ८ हजार ३४३, तिळासाठी १० हजार ३४६ रुपये प्रतिक्विंटल इतका एमएसपी दिला जाईल.*

*भारताच्या कोळसा आणि लिग्नाइट गॅसिफिकेशन उपक्रमाला गती देण्याच्या उद्देशाने कोळसा आणि लिग्नाइट गॅसिफिकेशन प्रकल्पांना प्रोत्साहन देण्यासाठीच्या योजनेलाही मंजुरी देण्यात आली. या योजनेसाठी ३७ हजार ५०० कोटी रुपयांची आर्थिक तरतूद केली आहे. या योजनेविषयी अश्विनी वैष्णव म्हणाले..*

***होल्ड.. बाईट - अश्विनी वैष्णव***

*या योजनेमुळे देशात कोळशाची विपुलता असलेल्या भागात सुमारे ५० हजार रोजगार निर्माण होण्याची अपेक्षा आहे.*

*नागपूर इथल्या आंतरराष्ट्रीय विमानतळाचं सार्वजनिक-खाजगी भागीदारीच्या माध्यमातून आधुनिकीकरण करायलाही आजच्या बैठकीत मंजुरी मिळाली. यासाठी मिहानला देण्यात आलेली लीज २०३९ पर्यंत वाढवण्यात आली आहे. जीएमआर ३० वर्षांसाठी हे विमानतळाचं संचालन करणार आहे.)*

**<><><><><><>**

केंद्र सरकारनं सोन्या चांदीवरचं आयात शुल्क ६ टक्क्यांवरुन १५ टक्के केलं आहे. प्लॅटिनमवर १५ पूर्णांक ४ दशांश टक्के आणि सोन्याची नाणी आणि इतर घटकांवरच्या आयात शुल्कातही वाढ करण्यात आली आहे.

यामुळं सोन्याचे दर तोळ्यामागे २७ हजार रुपयांनी वाढतील. आणि विक्रीवर याचा १०-१५ टक्के परिणाम होईल, असं अखिल भारतीय जेम्स आणि ज्वेलरी परिषदेचे अध्यक्ष राजेश रोकडे म्हणाले.

**<><><><><><>**

सीबीएसई अर्थात केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळानं आज बारावीच्या परीक्षेचे निकाल जाहीर केले. त्यात ८५ टक्क्यांहून अधिक विद्यार्थी पास झाले असले तरी गेल्यावर्षीच्या तुलनेत निकालात घट झाली आहे. मुलींमध्ये पास होण्याचे प्रमाण ८८ टक्के तर मुलांमध्ये हे प्रमाण ८२ टक्के आहे. यंदा १७ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांना ९५ टक्के पेक्षा जास्त तर ९४ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांना ९० टक्क्यापेक्षा जास्त गुण मिळाले आहेत.

**<><><><><><>**

नीट पेपर फुटी प्रकरणी सीबीआयनं आत्तापर्यंत जयपूरमधून ३, गुरुग्राम, नाशिक आणि अहिल्यानगरमधून प्रत्येकी एक अशा ६ आरोपींना अटक केली आहे. देशभरातल्या अनेक ठिकाणी ही शोधमोहीम राबवण्यात येत आहे. या अंतर्गत

विविध ठिकाणांहून मोबाईल फोन्स, आक्षेपार्ह साहित्य तसंच इलेक्ट्रॉनिक्स उपकरणं पोलिसांनी ताब्यात घेतली आहेत.

अहिल्यानगर जिल्ह्यातल्या राहुरी तालुक्यातल्या धनंजय लोखंडे याला सीबीआयनं आज अटक केली. ट्रान्झिट रिमांड मिळाल्यानंतर त्याला दिल्लीला नेण्यात येईल. सकाळी ११ पासून ६ वाजेपर्यंत त्याच्यासह इतर दोघांची चौकशी झाली. पण इतरांना सीबीआयनं चौकशीनंतर सोडून दिलं.

या प्रकरणात नाशिकमधून अटक केलेला शुभम खैरनार याला मुंबईतल्या एका दंडाधिकारी न्यायालयानं सीबीआयकडे दोन दिवसांची ट्रान्झिट रिमांड मंजूर केली आहे. त्याच्या भावालादेखील आज नांदगाव इथून ताब्यात घेण्यात आलं असून त्याची देखील चौकशी करण्यात येत आहे.

पुणे पोलिसांनी पुण्यातल्या बिबवेवाडी परिसरातून एका महिलेला ताब्यात घेतलं आहे. प्राथमिक चौकशीनंतर त्या महिलेला सीबीआयच्या ताब्यात देण्यात आलं आहे.

**<><><><><>**

राज्यातले मंत्री आणि अधिकाऱ्यांच्या परदेश दौऱ्यावर राज्य सरकारनं निर्बंध लादले आहेत. मुख्यमंत्र्यांसह सर्व मंत्र्यांच्या ताफ्यातील वाहनांची संख्याही सरकारनं अर्धी केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईत झालेल्या आढावा बैठकीत हे निर्णय झाले. इंधन आणि परकीय चलन बचतीच्या अनुषंगाने प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद म्हणून सरकारनं हे निर्णय घेतले आहेत. अत्यावश्यक वगळता इतर दौऱ्यासाठी विमान किंवा हेलिकॉप्टर ऐवजी नियमित विमानसेवेचा वापर करण्याचे निर्देशही सरकारनं दिले आहेत. तसंच सध्या आठवड्यातून किमान १ दिवस सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा वापर करण्याचं आवाहन मंत्री आणि अधिकाऱ्यांना करण्यात आलं आहे.

दूरदृश्य प्रणालीच्या सहाय्याने बैठका, वीज बचतीसाठी अनावश्यक होर्डिंगवर कारवाई करावी असंही सरकारनं म्हटलं आहे.

**<><><><><><>**

नाशिक सिंहस्थ कुंभमेळ्याच्या बोधचिन्हाचं अनावरण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार यांच्या हस्ते आज मुंबईत झालं. त्रिशूळ, त्र्यंबकेश्वर मंदिर आणि गोदावरी नदी यांचं दर्शन घडवणारं हे बोधचिन्ह सांस्कृतिक वारसा, भारतीय परंपरा आणि राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश प्रभावीपणे देणारे असल्याचं मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितलं. पत्रकारांशी संवाद साधताना मुख्यमंत्री म्हणाले..

**होल्ड.. बाईट - फडणवीस**

कुंभमेळ्याच्या बोधचिन्हासाठी कुंभमेळा प्राधिकरणाच्या वतीने स्पर्धेचं आयोजन करण्यात आलं होतं. या स्पर्धेत सुमारे तीन हजारांहून अधिक स्पर्धकांनी सहभाग घेतला. या स्पर्धकांमधून तीन उत्कृष्ट स्पर्धकांचा यावेळी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

**<><><><><><>**

सांगली जिल्ह्यात जत तालुक्यातील मोटेवाडी आसंगी तुर्क इथल्या मरगुबाई यात्रेदरम्यान काल सहा भाविकांचा मृत्यू झाला. अचानक आलेल्या पावसामुळे हे भाविक भिंतीच्या आडोशाला बसले असता भिंत कोसळून हा अपघात झाला. भाविकांच्या निधनाबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी तीव्र दुःख व्यक्त केलं आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही या दुर्घटनेबद्दल तीव्र दुःख व्यक्त केलं आहे.

**<><><><><><>**

राज्याच्या अनेक भागात आज अवकाळी पावसानं हजेरी लावली आहे.

**सातारा** शहरासह तालुका आणि इतर भागात वादळी वाऱ्यासह मेघगर्जना करत मुसळधार पाऊस सुरु  आहे.  या पावसामुळे नागरिकांना दिलासा मिळाला असला

तरीही आंबा आणि इतर फळपीकांचं मोठं नुकसान होण्याची शक्यता असल्याचं आमच्या बातमीदारानं कळवलं आहे.

**भंडारा** जिल्ह्यात देखील आज संध्याकाळी अवकाळी पावसानं जोरदार हजेरी लावली आहे. शेतात कापून ठेवलेलं धान वाचविण्यासाठी शेतकऱ्यांची तारांबळ उडाली असून अचानक आलेल्या या पावसामुळे पीक धोक्यात येण्याची भिती वर्तवली जात आहे.

**बीड** जिल्ह्यातल्या बीड, किल्ले, धारूर, पाटोदा, केज तसंच अंबाजोगाई तालुक्यातल्या काही गावांमध्ये आज दुपारी जोरदार पावसानं हजेरी लावली. अवकाळी पावसाबरोबरच पाटोदा तालुक्यामध्ये जोरदार गारपीट झाल्याचं वृत्त आहे.

**<><><><><><>**

हवामान विभागानं अकोला, अमरावती आणि वर्धा या जिल्ह्यांना मुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्ट दिला आहे. या जिल्ह्यांमध्ये वादळी वारे, गारपीट होण्याची शक्यता आहे. दक्षिण, पश्चिम महाराष्ट्र तसंच नांदेड, लातूर, धाराशिवमध्ये काही ठिकाणी वादळी वाऱ्यासह पावसाचीही शक्यता आहे. उत्तर महाराष्ट्र आणि मराठवाड्यात हवामान उष्ण राहण्याची शक्यता आहे.

**<><><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु आणि कोलकाता नाईट रायडर्स यांच्यातल्या सामन्यातली नाणेफेक पावसानं उशिरा होणार आहे. रायपूरमध्ये संध्याकाळी साडे सात वाजता हा सामना सुरू होणार होता.

**<><><><><><>**

रेल्वेनं २००८ मध्ये राबवलेल्या भरती प्रक्रीयेच्या वेळी चिथावणीखोर तसेच प्रक्षोभक भाषण केल्यानं ही परिक्षा देणाऱ्या उत्तर भारतीय आणि बिहारच्या उमेदवारांना मनसेच्या कार्यकर्त्यांनी मारहाण केली. हा आरोप अमान्य असल्याचा

पुनरुच्चार मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी आज ठाणे न्यायालयासमोर केला. त्यांच्यासह ७ जणांचे जबाब न्यायालयानं आज नोंदवले.

//<><><><><><>//